Mahatma Gandhi
Education & Welfare Society

ONE DAY INTERDISCIPLINARY INTERNATIONAL CONFERENCE ON

**RECENT ADVANCES IN LANGUAGES, LITERATURE AND SOCIAL SCIENCES**

*Organized by*
**M.G.E.W Society's**

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES**

KALYAN (W), DIST. THANE - 421 301.(M.S.)
In collaboration with
**NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES (ISSN: 2348-1390)**
www.newmanpublication.com

New Man Publication

# Certificate

*This is to certify that Dr. / Ms. / Mr.* Prilee K. Umathe *of* Dr M. K. Umathe College, Nagpur *has actively participated in One-day Interdisciplinary International Conference on* ***"Recent Advances in Languages, Literature and Social Sciences"*** *held on 17th February, 2018 at* Maulana Abul Kalam Azad Research Centre, T.V.Centre Road, Aurangabad.

*He / She presented a paper entitled*

दलित साहित्य : संकल्पना आणि दलित कादंबरी

| | | |
|---|---|---|
| **Dr Kalyan Gangarde** | **Dr Ramkishan Bhise** | **Dr Krutika Khandare** |
| Chief Organizer | Convener | Organizing Secretary |

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur

VOL 4 | ISSUE 2 | FEB 2018
(UGC Approved Journal No 63716)

ISSN 2454-5503
IMPACT FACTOR 4.197 (IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**
On the Occasion of One Day International Conference On

# RECENT ADVANCES IN LANGUAGES, LITERATURE AND SOCIAL SCIENCES

17th February, 2018

**(BOOK- 3)**

*Guest Editors*
**Dr. Rajaram Sontakke**
**Prof. Ravindra Ahire**

ORGANIZED BY
MGEWS
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN, DIST. THANE &**
**NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF MULTI-DISCIPLINARY STUDIES, PARBHANI**

www.newmanpublication.com

अनुक्रमणिका....


| | | |
|---|---|---|
| 1. मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीच्या बोलीचे स्वरूप व संकल्पना | डॉ. ललित दगडू अधाने | ०६ |
| 2. १९६० नंतरचे स्त्रीवादी साहित्य | प्रा. डॉ.गोपीनाथ पा. बोडखे | १० |
| 3. आदिवासी कादंबरीतील स्त्री जीवन | लोकडे सोनाली अशोकराव | १३ |
| 4. आदिवासी साहित्य – एक धावता आढावा | प्रा.स्मिता ओंकारराव माळवे | १६ |
| 5. मराठी ग्रामीण कादंबरीत आलेले सहकारी साखर कारखान्यातील भ्रष्टाचाराचे चित्रण | प्रा. विनायक जाधव | १९ |
| 6. भुजंग मेश्राम यांच्या कवितेतील सांस्कृतिक संघर्ष | प्रा.अरविंद आसाराम भराडे | २२ |
| 7. मराठी बोली भाषा अभ्यासाची परंपरा व महत्व | प्रा.डॉ. मीनाक्षी देव (निमकर) | २४ |
| 8. नव्वदोत्तरी मराठी कवितांवर जागतिकीकरणाचा प्रभाव | डॉ. आशा सोपानराव गिरी | २९ |
| 9. अभ्यासक्रमांतर्गत भाषेचे स्थान | डॉ. आशा म. धारस्कर–भावसार | ३१ |
| 10. दलित साहित्य : संकल्पना आणि दलित कादंबरी | डॉ. प्रीती किषोर उमाठे | ३४ |
| 11. नाट्यशास्त्र शिक्षणासाठी गुरूकुल परंपरा काळाची गरज...! | डॉ. मोनिका शांतीलाल ठक्कर | ३८ |
| 12. 'तृष्णा' या-आदिवासी कादंबरीतून आलेला जीवनसंघर्ष | डॉ. प्रेमला मुखेडकर | ४३ |
| 13. "जैन साहित्यातून अभिव्यक्त होणारे शासन देवता अथवा यक्ष--यक्षिणी" | डॉ. महाजन पी.बी. | ४६ |
| 14. भटक्या विमुक्तांचे आत्मकथन | डॉ.गजानन जाधव | ४८ |
| 15. मराठवाडयाच्या ग्रामीण कथेतील बोली आणि कथेचे स्वरुप | डॉ.एल.डी.गलंडे | ५० |
| 16. दलित साहित्य नामकरणासंदर्भात | डॉ.अक्षय किषोर घोरपडे | ५२ |
| 17. ग्रामीण साहित्यातील वैश्विकता | डॉ. चौधरी एन. डी. | ५५ |
| 18. आदिवासी साहित्य समृध्द करण्यात लोकनृत्याचे योगदान | श्री. बाळू हिरामण घुटे | ५७ |
| 19. गझल : मराठी, मुस्लीम साहित्य प्रकार | प्रा. कल्पना कृ. जाधव | ६१ |
| 20. मराठी दलित आत्मकथनातील भाषिक वैशिष्टये | डॉ. प्रकाश ज्ञानोबा जाधव | ६५ |
| 21. मराठी भाषा आणि साहित्य | डॉ. रंजना मधुकर कदम | ७० |
| 22. जागतिकीकरणाच्या प्रभावातील दलित कवी : अक्षय घोरपडे | डॉ.विजेंद्र विष्वनाथ पाटील | ७४ |
| 23. ग्रामीण कादंबरीतील दुष्काळाचे चित्रण | प्रा.डॉ.रामचंद्र झाडे | ७७ |
| 24. ग्रामिण साहित्य : प्रादेषिक कादंबरी | डॉ. अनिता प. खंडागळे | ७९ |
| 25. नारायण धारप यांच्या भयकादंबरी साहित्यातील भयाविष्कार | प्रा.अनिता महादेव भद्रे | ८२ |
| 26. 2000 नंतरची यशवंत मनोहर यांची कविता | डॉ.शिवसांब कापसे | ८६ |
| 27. उपेक्षितांच्या जीवनाचे मराठी साहित्यातील अभिव्यक्तिचे स्वरूप | प्रा.गणेश शिवाजी मारेवाड | ८८ |
| 28. बदलते ग्रामीण जीवन,साहित्य आणि जागतिकीकरण...! | डॉ.मधुकर गणेश मोकाशी | ९२ |
| 29. राघववेळः मातंग समाजातील कुटुंबाची स्वविकसनाची कथा | प्रा.राहुल भगवान चव्हाण | ९८ |
| 30. ग्रामीण कादंबरीतील शोषिक स्त्री | डॉ. सतोष देशमुख | १०४ |
| 31. दलितांच्या उद्धारासाठी झालेल्या दलित चळवळी | प्रा.आर.एस्.शनवार | १०४ |
| 32. मराठी मुस्लीम वैचारिक चळवळ आणि साहित्य | शेख म. रफी म. युसूफ | १०४ |
| 33. गौळण : संताचा मनोरंजनातून समाजप्रबोधनाचा सांस्कृतीक अविष्कार | डॉ.मुंजाभाऊ बाबुराव धोंडगे | १०४ |

# दलित साहित्य : संकल्पना आणि दलित कादंबरी

**डॉ. प्रीती किषोर उमाठे**
मराठी विभाग प्रमुख
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, नागपूर
मो.नं. : 9823052780

साहित्य आणि समाज यांचा संबंध अतूट आहे. केवळ 'स्वान्तः सुखाय' आणि 'मनोरंजनाचा' हे साहित्याचे प्रयोजन साहित्य कलेला व्यापक परिणाम देऊच शकत नाही. मानवी जीवन, समाज, निसर्ग आणि साहित्यकला यांचा परिवर्तनाषी धनिष्ट संबंध आहे. साहित्येतिहासात सहज डोकावले तरी लक्षात येते की, सकस साहित्याची निर्मिती समाजापासून दूर होऊन झालेली नाही. कलाकृतीचा निर्माता हा एक सामाजिक घटक आहे. त्यांच्या संवेदनषील मनाला समाज वास्तव सतत आव्हान देत असते. ही आव्हाने पेलतांना नकार, विद्रोह आणि ताणतणाव त्यांच्या लेखनापासून दूर राहू शकत नाही. मुळात त्यांच्या निर्मितीच्या प्रेरणा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकिय आणि शैक्षणिक पर्यावरणात असतात. सुप्रसिद्ध साहित्यिक बाबुराव बागुल म्हणतात त्याचप्रमाणे 'साहित्य हे जगण्याबरोबर चालते' हे जगण्याबरोबर साहित्याचे चालणे जगणे उन्नत करतेच आणि त्याबरोबरच साहित्यकलेलाही व्यापक परिणाम देते. ज्या साहित्याच्या मुळाषी संघर्ष व क्रांतीकारक परिवर्तन या प्रेरणा असतात त्याला एक आगळेच सामर्थ्य लाभते. ध्येयवादी लेखक जेव्हा आपल्या साहित्यात आपले जीवनसत्व ओततो, तेव्हा त्याचे शब्द शस्त्रापेक्षाही धारदार व परिणामकारक होतात. प्रत्यक्षात सामुदायिक कृतीच्या द्वाराच समाजात नव्या नव्या प्रवृत्ती जन्म घेत असतात. या प्रवृत्तींचा वेध घेणे त्यांना, शब्दरूप देणे, त्यामागील प्रेरणांची लोकांना ओळख करून देणे, अस्फुट व अलक्षित असणाऱ्या लोकांच्याच प्रेरणा त्यांच्या प्रत्ययाला आणून देणे हे साहित्याचे कार्य असते.

1945 नंतर किंबहुना त्या आधीही महात्मा फुलेंच्या कालखंडातसुद्धा समाज परिवर्तनाची एक निष्चित भुमिका घेवून साहित्यनिर्मिती झालेली आहे. महात्मा फुल्यांचा 'षेतकऱ्यांचा आसुड' किंवा समग्र सास्कृतिक परिवर्तनाची मांडणी करणारी 'गुलामगिरी' इत्यादी साहित्यातून आमुलाग्र परिवर्तनाची जाणीव ही लेखनाची प्रेरणा दिसून येते. महात्मा फुले यांच्या साहित्यातून कृतिषील अविष्काराची प्रचंड उर्जा आहे. 1945 नंतर मराठी साहित्यात साहित्य आणि चळवळ यांचा अतूट संगम दिसून येतो. उदा. दलित साहित्य प्रवाहाची निर्मिती प्रेरणा मानवमुक्तीची आंबेडकरी विचाराची चळवळ आहे. तरी ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य यांचा प्रेरणा महात्मा फुले यांचे विचार व कृती आणि स्वातंत्र्य–समतेची प्रेरणा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परिवर्तनवादी विचार तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्ये दलित साहित्याचा प्राण आहे. 1956 सालच्या धम्मचक्र प्रवर्तनानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनातील बौद्ध धम्म तत्वज्ञानाची दिषा मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक लढाई अधिक तिव्र व सक्षम बनली. या पार्ष्वभूमीवर दलित तरूण–तरूणींना स्वतःभोवताच्या विरूप वास्तवाचे चिंतन साहित्यातून साकार केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित चळवळीचा प्रारंभ केल्यापासून त्यांची तत्वप्रणालीचा आधार घेवून दलित साहित्य निर्माण झालेली आहे. दलित साहित्याची प्रेरणा आंबेडकरी तत्वज्ञान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चालवलेले समाज परिवर्तनाचे आंदोलने हे क्रांतीगर्भ आणि महत्त्वपूर्ण होते. महाडचा 'चवदाळ तळ्याचा सत्याग्रह', नाषिकचा 'काळाराम मंदिर सत्याग्रह', पुण्यातील 'पर्वतीचा सत्याग्रह' आणि नागपूरातील 'धम्मदीक्षा' इत्यादी आंदोलने दलित समाजाला सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अस्मिता जागृती देण्यासाठी होती. डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनामुळे सामाजिकदृष्ट्या पीडित असणारा दलित समाज जागा झाला. आणि या सामाजिक समस्यांना जबाबदार असणाऱ्या परंपरागत अमानुष व्यवस्था व त्यांच्या आधारे चालत असलेल्या जीवनप्रणालीचा त्यांनी त्याग केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र व्यक्तिमहत्वाची प्रभावातून दलित समाजाला सामाजिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनात अर्तबाह्य बदल घडून आला. थोडक्यात दलित समाजाच्या परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये दलित साहित्याचे बहूमूल्य योगदान आहे.

सामान्यतः दलित साहित्य 1960 पासून निर्माण होऊ लागले. 2 मार्च 1958 रोजी महाराष्ट्र दलित साहित्य परिषदेचे पहिले साहित्य संम्मेलन मुंबई मध्ये बी.सी. कांबळे[2] यांच्या अध्यक्षतेखाली झाले. अण्णाभाऊ साठे हे उद्घाटक होते. घनःष्याम तळवटकर स्वागताध्यक्ष होते. या संस्थेने 1962 मध्ये 'महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद' असे नाव धारण केले. परंतू 1967 पासून पुन्हा 'दलित साहित्य' हेच नाव स्थिर झाले. साधारणतः 1960 पासून 1990 च्या जवळपास

दलित साहित्यिक, विचारवंत आणि साहित्याच्या भाष्यकारांनी 'दलित साहित्य' याच संकल्पनेचा आग्रह धरला. बाबुराव बागल, म.भि. चिटणीस, डॉ. गंगाधर पानतावणे, अर्जुन डांगळे, केषव मेश्राम, पूर्वार्धातले यषवंत मनोहर, ज्योती लांजेवार, दत्ता भगत, कृष्णा किरवले, इत्यादी सर्वांनी दलित साहित्य संकल्पनेचा स्वीकार केला. वेदना, विद्रोह, नकार ही दलित साहित्याची मूल्ये आहेत. दलित साहित्य निर्मितीची प्रेरणा ही फुले–षाहू–आंबेडकरी आहे असे मान्य केले जाते. हे सर्व योग्यच आहे. दलित साहित्याचे एकूण मराठी साहित्यात मौलिक योगदान आहे. साठीच्या दषकात दलित साहित्याची चळवळ उभी राहिली. आपले जगण्यामरणाचे प्रष्न दलितांनी वाङमयाचे विषय बनविले. आषय, रूप व मूल्ये या तीनही पातळ्यांवर दलित साहित्याने बंडखोरीचा भूमिका घेतली.

**दलित साहित्याची संकल्पना :** दलित साहित्याचे उद्‌गाते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पश्चात दलितांमधील एकमेव सर्वकष प्रतिभासंपन्न द्रष्टे विचारवंत डॉ. म.ना. वानखेडे यांनी "'दलित' या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासर्गीय नव्हे, तर जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहे ते सर्व दलित व्याख्येत समाविष्ट होतात."[1] अषी केली आहे. बाबुराव बागूलांनी महाड येथील बौद्ध साहित्य संमेलनात जी व्याख्या केली आहे ती या व्याख्येला धरूनच आहे. ते म्हणतात, "दलित साहित्य माणसाला केंद्रबिंदू मानते. मानसाच्या सुखदुःखाषी समरस होते व माणसाला सम्यक क्रांतीकडे घेऊन जाते. माणसाच्या समुहाला म्हणजेच समाजाला समतेची षिकवण देते. माणसाला महान मानते. दलित साहित्य हे माणसामाणसातील वैरभाव न पसरविता ते माणसामाणसात प्रेम वाढवते, पसरवते".[2]

महाबळेष्वरच्या साहित्य संमेलनातील परिसंवादात प्रा. केषव मेश्राम म्हणाले होते की, "हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला अषा अस्पृष्यांना दलित म्हटले पाहिजे व त्यास वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे."[3]

राजा ढाले म्हणतात, "एक बंदिस्त समाजरचनेतून आणि एका सांस्कृतिक व्यूहातून ती समाजरचना व तो सांस्कृति बंध तोडून–फोडून बाहेर पडणारा समाज आणि त्या आधीच ते बंध झुगारून बाहेर पडलेला समाज यांच्यात एक कल्चरल युनिटी असेल कारण, त्यांची दुःखेच केवळ समान नसतील तर इप्सितेही समान असतील. म्हणून जो जो या समाजरचनेविरूद्ध आणि सांस्कृतिक व्यूहाविरूद्ध लढणारा दृष्टिकोन घेऊन साहित्यनिर्मिती करील आणि वाट चुकलेल्या समाजाला वाटेवर आणील तो तो दलित साहित्यक असेल आणि त्याचे साहित्य हे दलितांच्या दृष्टिकोनातून लिहिलेले असेल."[4]

शरच्चंद्र मुक्तिबोध म्हणतात, "दलित वाङमय म्हणजे दलितोद्धाराचे वाङमय नव्हे. माट्यांचे वाङमय किंवा खांडेकरांच्या 'दोन मने' या कादंबरीचा नायकही दलितच आहे. ह्यात लेखक वरिष्ठ वर्गाचा असून तो कनिष्ठ वर्गाकडे अनुकंपेच्या दृष्टीने पाहतो. हे दलित वाड्.मय नव्हे किंवा दलित लेखकांनी निर्माण केलेले वाङ्मयी दलित साहित्य नव्हे. दलित असणे व दलित जाणीव असेण हे भिन्न आहे. दलित जाणिवेतून दलित जीवनविषयक जे वाङ्मय निर्माण होते ते दलित वाङ्मय."[5]

भालचंद्र फडके यांच्यानुसार, "बौद्ध, अबौद्ध, महार, चांभार, पूर्वास्पृष्य, भटक्या जमाती, आदिवासी, गुन्हेगार जमाती इत्यादी विविध समूह म्हणजे सामाजिक अन्याय, दारिद्र्य, अज्ञान इत्यादींनी ग्रस्त असा दलितवर्ग! या वर्गाला रानटी, दुष्ट परंपरा, अंधश्रद्धा, देववाद, भोळेपणा, गुलामगिरी याविरूद्ध बंडाला, लढ्याला उधुक्त करणारी जाणीव ती दलित जाणीव! या जाणीवेतून दलित जीवनाचे भेदक दर्षन घडविणारे साहित्य ते 'दलित साहित्य'! ते साहित्य केवळ दलितांसाठी अवतरलेले नाही तर ते सर्वांसाठी आहे; जे जाणून मोठा मानतात त्या सर्वांसाठी."[6]

डॉ. यषवंत मनोहर म्हणतात, "दलित साहित्यिक दलित जाणिवेची अभिव्यक्ती करतो. लिहिणाऱ्याच्या जातीवरून दलित साहित्यिकाचा शोध मांडणे तर्कसंगत नाही. उलट जाती, वर्णकर्मविपार्क, ईष्वर इत्यादी बाबींनी सिद्ध होणारा, दलित्वाच्या संगोपनाला कारण ठरलेला सर्व विचार संकल्लावूह नाकारून निर्मिती करणारा पिंड हा दलित पिंड होय, ती प्रतिभा दलित प्रतिभा होय आणि तो साहित्यिक दलित साहित्यिक होय. दलित साहित्यिकाची जात, धर्म, वर्ण, देववाद सिद्ध झाला की त्याचे दलित साहित्यिक नसणेही सिद्ध होऊन जाते. जडवादी, विज्ञानवादी, न्यायवादी पिंड सिद्ध होईल. ही क्रांतिमान मानसिकता सिद्ध होईल तो वाङ्मयव्यवहार हा दलित वाङ्मयव्यवहार होय व वाङ्मयव्यवहाराचा सर्जक दलित साहित्यिक होय."[7]

पु.ल. देषपांडे म्हणतात, "दलित वाङ्मयाने मराठी साहित्यात प्रथम जर काही आणले असेल तर संतापातून चमकणारे अश्रू, अन्यायाविरूद्ध उठतांना संतापातून फुटणाऱ्या अश्रूंचे मोल हे सर्वात मोठे असते. सामान्यांच्या भाषेत हा तळतळाट असतो. ह्याच तळतळाटाचे एक उदात्त स्वरूप म्हणजे दलित साहित्य."[8]

बाबुराव बागूल यांच्यानुसार, "माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे वंष, वर्ण आणि जातिश्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य."[9]

प्र.श्री नेरूरकर यांच्या मताप्रमाणे, "दलित समाजात जन्माला आलेल्या व दलित वर्गाची पिळवणूक, त्यांच्या विविध स्तरांवरचा पाषवी छळ व त्यांचे माणुसकीला मुकलेले जीवन यांचा प्रत्यक्ष व जिवंत अनुभव घेणाऱ्या दलितवर्गातील साहित्यिकांनी मराठीत पहिलावहिला केलेला प्रक्षोभक, विद्रोही व सर्जनपुष्ट अविष्कार म्हणजे दलित साहित्य होय."[10]

गंगाधर पानतावणे म्हणतात, "दलित साहित्याची चळवळ हा एक मुक्तीसंग्राम आहे. स्वतःला शोधण्याचा तो एक प्रभावी प्रयत्न आहे. मराठी वाङ्मयात माझे असे चित्र कुणीही रेखाटले नाही. हे चित्र रेखाटण्याची धडपड म्हणजे दलित साहित्य."[11]

कवी वामन निंबाळकर म्हणतात, "दलित साहित्याने मानवतावादीची नव्याने मांडणी केली आहे. आजपर्यंत साहित्यिकांनी कल्पनारम्य साहित्याला जिवंत ठेवण्यासाठी प्रयोग व प्रयत्न केले. आज आम्ही माणसाला जिवंत ठेवण्यासाठी साहित्याचा प्रयोग करतो आहोत. त्यांनी फक्त साहित्याला सुंदर केले. दलित साहित्याने माणूसच सुंदर केला. त्यांनी भोगवादी कल्पनारम्य साहित्याचा सत्कार केला. दलित साहित्याने माणसाच्या सभ्यतेचा सत्कार केला. त्यांनी कलेच्या शुद्धतेसाठी मानवतेची हत्या केली. दलित साहित्यिक मानवतेच्या शुद्धतेसाठी साहित्याचा आणि कलेचा उपयोग करीत आहेत. दलित साहित्य भूतकाळातील जगण्याला गौरव मानीत नाही, तर ते त्याचा तिरस्कार करते, धिक्कार करते. भविष्यातील कल्पनारम्य सौंदर्यवादावर त्याचा मुळीच विष्वास नाही तर ते वर्तमानातील प्रकाषमान जीवन अधोरेखित करते."[12]

या सर्व दलित व दलितेतर लेखकांनी या साहित्याच्या केलेल्या व्याख्या आपण पाहिल्या तर एक गोष्ट आपणास विषेषत्वाने जाणवते ती ही की, यात दलित हा केंद्रस्थानी आहे. अन्याय–अत्याचाराने तो पीडित आहे. या पिडेला अधिक व्यापक रूप देण्याचा प्रयत्न बाबुराव बागूलांनी केला. परंतु, मुक्तिबोधांनी अधोरेखित केलेली 'दलित जाणीव' अत्यंत समर्पक अषी आहे. तिला दिर्घ असा सांस्कृतिक अर्थ आहे. जेव्हा हे साहित्य मोठ्या प्रमाणात लिहिले जात होते तेव्हा दलितेतरांनी हा प्रष्न उपस्थित केला होता की, तुम्ही स्वतःला दलित का बरे म्हणवून घेता? त्यामागील त्यांची भावना निर्मळ होती यात शंका नाही, पण आपल्याच धुंदीत असलेल्या लेखकांनी उलट 'दलित' हा शब्द किती क्रांतीकारक आहे हेच पटवून देण्याचा प्रयत्न केला.

**दलित कादंबरी** : दलित जाणिवेची दलित जीवनासह अभिव्यक्ती करणारी कांदबरी म्हणजे 'दलित कांदबरी' होय. अषा कादंबरीत दलित सामाजिक जाणिवांचे अपरिहार्य दर्षन घडावे असे अपेक्षित असते. दलित जाणिवेच्या लेखकाला सामाजिक भान व दलित संवेदनषीलता असावी लागते. असे झाले तरच दलित वास्तव जीवनाचे चित्रण कादंबरीत येऊ शकते व अषी कादंबरी दलित या विषेषणाने संबोधली जाऊ शकते. दलित कादंबरीत सामाजिक बांधिलकीचा एक विचार वारंवार मांडला जातो. दलित कादंबरी ही सामाजिक बांधिलकी मानणारी कादंबरी असते. बांधिलकी म्हणजे जाणीवपूर्वक बौद्धिक पातळीवर मान्य केलेली निष्ठा होय. ही बांधिलकी निष्ठावंत असेल तर साहित्यपर लेखन कसदार होईल असे म्हटले जाते. परंतु, कधीकधी बांधिलकीच्या अतिरेकातून संकुचितपणा व साचेबंधपणा हे दोष निर्माण होऊ शकतात. दुसरे म्हणजे या बांधिलकीचा व्यापक अर्थ घेतला तर ठीक अन्यथा एका जातिवर्तुळाची मर्यादा अषा साहित्याला पडू शकते. दलित साहित्यानेही बांधिलकीची प्रेरणा समूहषी निगडित केली आहे. त्यामुळे या साहित्यामागे मानवतावादी, ईहवादी व परिवर्तनवादी अषा प्रेरणा आढळतात. न्याय, स्वातंत्र्य व समता मुल्यांचा पुरस्कार करतांनाच मानवतेचा मार्ग प्रषस्त करण्याचा या कादंबरीलेखनाचा प्रयत्न असतो.

दलित जीवनाचे चित्रण करतांना त्याला केवळ वर्णनात्मक स्वरूप प्राप्त होऊ नये तर कादंबरीचा तो अविभाज्य भाग झाला पाहिजे याची काळजी घेतली गेली पाहिजे. काही अपवाद वगळले तर अनेक दलित कादंबरीकारांनी दलित जाणिवांच्या नावीन्यपूर्ण अभिव्यक्तीमुळे मराठी कादंबरीच्या आषयद्रव्याच्या मर्यादा विस्तृत केल्या आहेत असे म्हणता येईल.

**दलित कादंबरीलेखनाचा आरंभ** : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी 'ष्यामसुंदर' (1925) या कादंबरीत पहिल्यांदा दलित जीवनाचे चित्रण केलेले आहे. अस्पृष्यांचे जीवन, त्यांची सुखदुःखे आकांक्षा व त्यांच्यावर होत असलेला अन्याय याचे चित्रण ही कादंबरी करते. या कादंबरीत ब्राम्हण, कुणबी, मराठा, अतिषुद्र (महार, मांग आणि परधान) या तीन समाजघटकांच्या परस्परसंघर्षाचे चित्रण आलेले दिसते. त्यांनतर खांडेकरांच्या 'दोन ध्रुव' (1934) आणि 'दोन मने' (1938) या कादंबऱ्यांमधून अस्पृष्यांचे ग्रामजीवनातील चित्रण आलेले आहे. या कादंबऱ्यांमध्ये सुधारणावादाच्या तुलनेत आदर्षवादच जास्त आढळतो. विभावरी षिरूरकर यांनी 'बळी' (1950) या मांगगारूडी व कथित गुन्हेगार जमातीच्या जीवनावर कादंबरी लिहिली. झोपडपट्ट्यातील दरिद्री जीवन, षिवराळ भाषा, गलिच्छ राहणी याचे हृदयद्रावक व वास्तव चित्रण 'बळी' कादंबरीत आले आहे. एका नविन भीषण जगाचे दर्षन या कादंबरीतून चित्रित केलेले आहे. र.वा. दिघे यांनी 'कार्तिकी' या कादंबरीतून काही प्रमाणात दलित चित्रण केल्याचे आढळते. माडखोलकरांच्या 'चंदनवाडी' तून या जीवनाचे दर्षन आपल्याला काही प्रमाणात घडते. असे असले तरी, या कादंबऱ्यांमधून आलेले दलित चित्रण हे केवळ सहानुभूतीपोटी व पार्ष्वभूमीसारखे आलेले आढळते.



37

साठोत्तर कादंबरी : 1935 च्या आसपास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य सुरू झाले होते. त्यांनी चालविलेली सामाजिक आंदोलने आणि महात्मा गांधींची अस्पृष्योद्धाराची व दलितांच्या बंधविमोचनाची आंदोलने यांच्या समिश्र परिणामातून खऱ्या अर्थाने दलित जाणिवेच्या कादंबऱ्यांना प्रारंभ झाला. अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' (1959) व तत्पूर्वीची ना.रा. शेंडे यांची 'काजळी रात्र' (1956) या कादंबऱ्या दलितं चित्रण करणाऱ्या होत्या. त्यानंतर 'मी मुक्त मी मुक्त' (1971), 'पारधी' आणि 'मी माझ्या गावाच्या शोधात' (1983) या शंकरराव खरातांनी लिहिलेल्या कादंबऱ्या दलित चित्रित करणाऱ्या आहेत. खरातांच्या कादंबऱ्यातून कणव, आक्रोष, अंतर्मुखता यातून पात्रांचा आंतरिक विद्रोह जसा प्रकट होतो तसेच बहिष्कृतांच्या व्यथा–वेदनांचे वास्तव मुखर करणारे जीवनदर्षनही घडते. बाबुराव बागूलांच्या 'सूड' (1979) या कादंबरीतून जानकी या वेष्येच्या मुलीचे म्हणजे मुरळीच्या मुलीचे भीषण जीवनचित्रण वाचायला मिळते तर त्यांच्या 'पावष्या' या कादंबरीतून अस्पृष्य स्त्रियांचे जीवनचित्रण1981 वाचायला मिळते. केषव मेश्राम यांच्या 'पोखरण' (1972) आणि 'हकीकत' आणि 'जटायू' (1980) या कादंबऱ्यांना दलित कादंबऱ्यांच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे. याषिवाय अषोक लोखंडे यांची 'निष्ठा' (1974), भि.सी. षिंदे यांच्या 'अमृतनाक' व 'रायनाक' (1980), सुधाकर गायकवाड यांची 'षुद्र', मुरलीधर जाधव यांची 'कार्यकर्ता' (1984), बळवंत कांबळे यांची 'नापत' (1984), राजन गवस यांची 'चौंडक' (1985) आणि 'भंडारभोग' (1988), माधव कोंडविलकर यांच्या 'अजून उजाडायचं आहे' (1981) आणि 'छेद' (1982), उत्तम बंडू तूपे यांची 'झूलवा' (1986), योगेंद्र मेश्राम यांची 'माझा गाव कुठे आहे' (1988), बा.स. हाटे यांच्या 'युगविधान' (1983) आणि 'युगंधर' (1988) या आंबेडकरांच्या जीवनसंदर्भातील कादंबऱ्या; तसेच अषोक व्हटकर यांचे 'मेललं पाणी' (1982), हरिभाऊ पगारे यांच्या 'कालिंदी' (1968), 'युगप्रवर्तक' (1970), आणि 'झुंजार' (1974) या कादंबऱ्या; नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळा' (1981), दि.रा. वाघमारे यांची 'कल्लोळ' (1987), विजय काळे यांची 'जागृती' (1985), निषिकांत शेंडे यांची 'कलंकमुक्ती', बंधू माधवांची 'रमाई' (1987), यषवंत मनोहरांची 'रमाई' (1991) इत्यादी दलित जीवनावरील कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत.

एकूण कादंबरी लेखनाचे प्रमाण पाहता दलित कादंबरी व नाटक यांचा क्षीण प्रवाहच आपल्याला आढळून येतो. अलीकडच्या काळात दलित नाटक व रंगभूमी यांनी काही प्रमाणात प्रगतीची झेप घेतली असली तरी त्या तुलनेत कादंबरीप्रवाह मात्र माघारलेला आहे असे जाणवते. आता दलित लेखकांनी आपल्या आत्मकथनांना कथा–कादंबरीचे रूप दिले तरच हा कादंबरीप्रवाह अधिक विषाल होण्याची शक्यता आहे. अनेक दृष्टींनी कादंबरीच्या भवितव्येचा काळ फार मोठा आहे.

दलित कादंबरीने प्रादेषिक ग्रामीण कादंबरीप्रमाणेच आपला मोहरा उपेक्षित अषा ग्रामीण व सामाजिक लोकजीवनाकडे वळविला. या कादंबरीने सामाजिक जीवनातील जी दुःखे समोर मांडली त्यामुळे जीवनाचे एक नवेच विष्व वाचकांसमोर आहे. दलित साहित्यात आत्मकथनांचा किंवा कथेच्या तुलनेत कादंबरी वाङ्मयप्रकार मर्यादित प्रमाणातच लिहिला गेला आहे. दलित कादंबरीचा प्रारंभ नंतर झालेला असून दलित कादंबरीची संख्या फार मोठी नाही. दलित कादंबरीने वास्तवेची व्याप्ती वाढविली आणि एकूणच मराठी कादंबरीवरील नवी दिषा दिली, ही बाब लक्षात घेतली पाहिजे.'

**संदर्भ सूची :**


१. म.ना. वानखेडे : 'दलितांचे विद्रोही वाङ्मय', संपादक वामन निंबाळकर, यषवंत मनोहर, प्रबोधन प्रकाषन, पृष्ठ क्र. 78
२. बाबुराव बागुल : 'दलितांचे विद्रोही वाङ्मय' संपादक वामन निंबाळकर, यषवंत मनोहर, प्रबोधने प्रकाषन, पृष्ठ क्र. 78
३. प्रा. केषव मेश्राम : 'दलित लेखकांचे पहिले अधिवेषन' 1958
४. भालचंद्र फडके : 'दलित साहित्य' : वेदना आणि विद्रोह पृष्ठ क्र. 32
५. तत्रैव', पृष्ठ क्र. 32
६. 'तत्रैव', पृष्ठ क्र. 33
७. यषवंत मनोहर : 'दलित साहित्य : सिद्धात व स्वरूप', पृष्ठ क्र. 12–13
८. पु.ल. देषपांडे : 'दलित साहित्य संमेलन : नागपूर', 1976, स्मरणिका, पृष्ठ 20
९. बाबुराव बागूल : सं.प्र. पत्रिका, भा–ए. 1971, पृष्ठ क्र. 34
१०. प्र.श्री. नेरूरकर : 'मायमराठी', ऑक्टोबर 1975 पृष्ठ क्र. 28
११. प्रा. गंगाधर पानतावणे : मागोवा, दिवाळी अंक 1973, पृष्ठ क्र. 80
१२. वामन निंबाळकर : 'अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन : अध्यक्षिय भाषणे' : मलपृष्ठावरील मजकूर
१३. प्रा. रा.ग. जाधव : नवोदित दलित कथा 'निळी पहाट', प्राज्ञपाठषाळा, प्रकाषन, वाई
१४. डॉ. यषवंत मनोहर : 'आंबेडकरवादी मराठी साहित्य' भीमरत्न प्रकाषन, नागपूर.
१५. डॉ. कृष्णा किरवले : 'दलित चळवळ आणि साहित्य' प्रतिमा प्रकाषन, सदाषिव पेठ, पुणे.


θθθ